# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.३०/०७/२०१९

## दि.२९/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ६९९/१९,भादविक ३९५,३२३,५०४,५०६,४२७,क्रिमीनल अबेंटमेंट लॉ चे कलम ३ व ७ प्रमाणे |
| **फिर्यादी** | महेश भालेराव,वय-२१ वर्षे,रा.माळवाडी,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | १.प्रकाश शिवाजी घाडगे,वय-२० वर्षे २.आकाश राजु जाधव,वय-२३ वर्षे ३.अमर दशरथ सकट, वय-२० वर्षे ४.दिनेश धनंजय राखपसरे,वय-१९ वर्षे ५.ओमकार मंगेश उभे,वय-१९,सर्व रा. काळेपडळ,गोसावी वस्ती,घुलेवस्ती हडपसर,पुणे (अटक) व इतर |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०७/२०१९ रोजी २३/३० वा.फिर्यादी यांचे घरा जवळ दत्त मंदिरा जवळ माळवाडी हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांची गणेश कुंभार याचेबरोबर भांडणे झाली होती. त्यावेळेस फिर्यादीं यांनी गणेश कुंभार यास मदत केल्याचा राग मनात धरुन,सदर इसमांनी संगनमत करुन फिर्यादी यांचे घराजवळ येवुन त्यांना शिवीगाळ करुन,त्यांचे शर्टाचे खिशातील रोख ६ हजार रुपये हे कोयत्याचा धाक दाखवुन बळजबरीने घेवुन गेले आहेत. तसेच फिर्यादी यांना लाथा-बुक्यांनी मारहाण करुन त्यांना व त्यांचे आई-वडील यांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर त्यांनी सार्वजनिक रोडवर पार्क केलेल्या वाहनावर कोयत्याने मारुन,सदर वाहनांचे नुकसान केले करून,सदर परिसरात दहशत निर्माण केली. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. चव्हाण ७०३८१९९३०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ६७१/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | राजेंद्र दगडे,वय-३२ वर्षे,रा.कस्पटे वस्ती,वाकड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०७/२०१९ रोजी १७/०० वा.ते दि.२९/०७/२०१९ रोजी सकाळी ०९/४० वा.चे दरम्यान प्रसन्न देसाई आर्किटेक्ट,फ्लॅट नं.१३, प्रणिती अपार्टमेंट,बाणेर रोड,सकाळनगर,औंध,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे प्रसन्न देसाई आर्किटेक्ट ऑफीस कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे ऑफीसचे दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून, ऑफीसचे ड्रॉवरचे लिफाफ्या मध्ये ठेवलेली २,२५,०००/- रुपये रोख रक्कम घरफोडी चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. टी.एम.फड ९८२३०५७१४१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ६७०/१९,भादविक २७९,३३७,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | एस.एम.पारधी, पोलीस हवालदार, चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | सुधीर कृष्णकांत कदम,वय-२६ वर्षे,रा.इंदिरा वसाहत,औंध,पुणे (उपचारा दरम्यान मयत झाला आहे.) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | २८/०७/२०१९ रोजी रात्री १९:०० वा ब्रेमेन चौक पिचोला हॉटेल समोर गणेशखिंड रोड औंध पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सी.पी.गुजर ७७२२०००६६७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ६७२/१९,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | पांडुरंग तळेकर,वय ५४ वर्षे,(पशुसंवर्धन विभाग,औंध,पुणे) |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०७/२०१९ रोजी १३/०० वा.ते दि.०८/०७/२०१९ रोजी सकाळी ०९/०० वा.चे दरम्यान लघुप्राणी विभाग,पशुसंवर्धन विभाग,पशु वैदयकिय जैवपदार्थ निर्मीती संस्था,औंध,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पशुसंवर्धन विभाग,औंध पुणे येथे नोकरीस असुन, त्यांचे पशु वैदयकिय जैवपदार्थ निर्मीती संस्था,औंध,पुणे हे ऑफीस हे उघडे असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने ऑफीसचे उघडया दरवाजावाटे आंत प्रवेश करून,एक संगणक संच प्रिंटरसह व इलेक्ट्रीक काटा असा एकुण ४५,५००/- रू किचा ऐवज चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. एस.एम.पारधी ९१३०९२४९२५ |
| ५ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ६७३/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५६ वर्षे,रा.बाणेर रोड,पाषाण,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०३/२०१९ रोजी फिर्यादी यांचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे घरा मध्ये काम करित असतान,फिर्यादी यांनी त्यांची गोपनीय माहिती माहिती कोणासही शेअर न करता,कोणीतरी अज्ञात इसमाने ऑनलाईन माध्यमाव्दारे फिर्यादी यांचे बँकेतील खात्यावरील ५०,०००/- रूपयांचे आर्थिक व्यवहार करून,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.निरी. (गुन्हे) वैशली गलांडे ९०११०३७७६२ |
| ६ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३०३/१९,भादविक ४२०,४६७,४६८,४७१ |
| **फिर्यादी** | अमित सैताने,वय-३५ वर्षे,(कंडक्टर पीएमपीएमएल),पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमी.पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०७/२०१९ रोजी ०९/३० ते १०/०० वा.चे दरम्यान पुणे स्टेशन येथील आंबेडकर पुतळ्या जवळील स्टॉप येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पीएमपीएमएल बस मध्ये कंडक्टर असुन,त्यांनी त्यांचे बस मध्ये पॅसेंजर म्हणुन बसणारा एक अल्पवयीन मुलगा याचेकडील असणारे बसचे पासबाबत फिर्यादी यांना संशय आल्याने त्यांनी बस पासची चौकशी केली असता,सदरचा पास नमुद इसम हा पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडचे नावाने खोटे बसचे पास बनवुन,लोकांना बसचे पासची विक्री करुन,ते खरे आहेत म्हणुन वापरायला देऊन,नागरीकांची तसेच शासनाची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पाटील ९५९४०००११८ |
| ७ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे २६०/१९,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-६० वर्षे,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०७/२०१९ रोजी १५/०० वा. ते १५/३० वा.चे दरम्यान फ़्लॅट नं.८,रथचक्र अपार्टमेंन्ट, तेजस नगर,कोथरुड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे रहते घर नजरचुकीने उघडे असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,त्यांचे राहते घराचे उघडया दरवाजवा वाटे आंत प्रवेश करून,कपाटातील १,५०,०००/- रु किचे सोन्याचे दागिने चोरी करून नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.आर.शिरसाठ ९८२२७६१०९० |

**"युनिट-५,गुन्हे शाखा यांचे गुन्हे प्रकटीकरणाचे पत्रकार परिषदे बाबत" दि.२२/०७/२०१९**

सर्व प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यांना कळविण्यात येते की, मा.पोलीस उप-आयुक्त,पुणे शहर श्री.बच्चन सिंह सर हे आज दिनांक ३०/०७/२०१९ (मंगळवार) रोजी १६/०० वा.मुख्य कॉन्फरन्स हॉल, पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर याठिकाणी 'युनिट-५,गुन्हे शाखा यांचे गुन्हे प्रकटीकरणाचे चांगले कामगिरी बाबत' पत्रकार परिषद घेणार आहेत.

तरी पत्रकार परिषदेसाठी आपले फोटोग्राफरसह आपली उपस्थिती प्राथनीय आहे.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर